महाराष्ट्र वन विभाग
दुरध्वनी क्रमांक :0231/2651959
Email ID:dycfkop2007r@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
उप वनसंरक्षक (प्रा) कोल्हापुर , कोल्हापूर यांचे कार्यालय
ताराबाई पार्क, कोल्हापूर. 416023

जा.क्र.अ/वप्रार/ 2024-25/ कोल्हापूर दि. 30.12.2024

# कंत्राटी पध्दतीने पशूवैद्यकीय अधिकारी यांची सेवा उपलब्ध होणे बाबत.

कोल्हापूर वनविभागाचे अधिनस्त ११ वनपरिक्षेत्रामध्ये मानव-वन्यजीव संघर्ष कमी करणेसाठी तसेच वन्यप्राण्यांस तातडीने वैद्यकीय सेवा पुरविणेसाठी विभागीय कार्यालय स्तरावर पशूवैद्यकीय अधिकारी (संख्या १) यांची कंत्राटी सेवा घेणेसाठी इच्छूक उमेदवार (Minimum Bachlor of Veterinary Science / B.V.Sc.) यांचेकडून दिनांक १५, जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज मागविणेत येत आहेत. सविस्तर जाहिरात http://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली असून, अर्जाचा नमूना उपलब्ध करून दिलेला आहे.

ठिकाण - कोल्हापूर
दिनांक

स्वाक्षरी/-
(जी.गुरूप्रसाद)
उपवनसंरक्षक,
कोल्हापूर वनविभाग, कोल्हापूर

# कंत्राटी पध्दतीने पशूवैद्यकीय अधिकारी यांची सेवा

# उपलब्ध होणे बाबत.

## <u>सविस्तर जाहिरात</u>

कोल्हापूर वनविभागाचे अधिनस्त ११ वनपरिक्षेत्रामध्ये मानव वन्यप्राणी संघर्ष कमी करणेसाठी व वन्यप्राण्यासाठी तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणेकामी विभागीय कार्यालय स्तरावर पशूवैद्यकीय अधिकारी (संख्या १) यांची कंत्राटी सेवा घेणेसाठी इच्छूक उमेदवार यांचेकडून दिनांक १५, जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज मागविणेत येत आहेत. तसेच, दिनांक १५, जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर केलेल्या व खालीलप्रमाणे शैक्षणिक व इतर अर्हता धारण करणा-या उमेदवारांस दिनांक २३ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११.३० वा. या कार्यालयामध्ये मुलाखतीस बोलावण्यात येत आहे.

**१. शैक्षणिक व इतर अर्हता :-**

अ) (Minimum Bachlor of Veterinary Science / B.V.Sc.)
ब) शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

**२. कामाचे स्वरुप :-**

कोल्हापूर वनविभागाच्या अधिनस्त आजरा, चंदगड, पाटणे, गारगोटी, कडगाव, राधानगरी, करवीर, गगनबावडा, पन्हाळा, मलकापूर व पेंडाखळे या वनपरिक्षेत्रामध्ये मानव - वन्यप्राणी संघर्ष कमी करणेच्या दृष्टीने उपवनसंरक्षक, कोल्हापूर वनविभाग कोल्हापूर व संबंधीत सहाय्यक वनसंरक्षक आणि वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे सूचनांप्रमाणे वन्यप्राण्यांसाठी तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे. तसेच, केलेल्या कामाचा साप्ताहिक अहवाल दर आठवडयाला संबंधित वनक्षेत्रपाल यांचेमार्फत उपवनसंरक्षक कोल्हापूर यांचेकडे सादर करणे.

**३. पदसंख्या, नियुक्ती कालावधी व मानधन इ.**

| अ.क्रं | पदाचे नाव | पद संख्या | मानधन | मुख्यालय | शैक्षणिक पात्रता | अनुभव | कार्यक्षेत्र | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी पशुवैद्यकीय अधिकारी | ०१ | ५०,०००/- प्रतिमहा | कोल्हापूर | B.V.Sc (Bachlor of Veterinary Science / B.V.Sc.) | वन्यजीव उपचार व हाताळणी संबंधी अनुभव आवश्यक | कोल्हापूर वनविभाग | ११ महिने |

पशुवैद्यकीय अधिकारी यांनी सेवा पुरविलेनंतर अनुदान उपलब्धतेनूसार मानधन अदा केले जाईल. निश्चित केलेले मानधन ११ महिन्याकरिता कायम राहील. मानधनामध्ये मुख्यालयाबाहेरचा प्रवास खर्च, दैनंदिन भत्ता इ. समाविष्ट आहे. त्यासाठी वेगळ्याने मागणी करता येणार नाही. तसेच, कोणत्याही क्षणी पूर्व सूचना न देता पशुवैद्यकीय अधिकारी यांची सेवा नाकारण्याचा अधिकार कोल्हापूर वनविभागाकडे कायम राहील.

**४. इतर अटी व शर्ती :-**

अ) पशूवैद्यकीय अधिकारी यांची सेवा कंत्राटी पध्दतीने घेण्यात येत असल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा हक्क/अधिकार नसेल.

ब) विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी सदर सेवा समाप्त करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

क) कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात आलेली व्यक्तीस, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशी कोणतीही कृती करता येणार नाही.

ड) कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात आलेल्या व्यक्तीचे गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

इ) कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व इतर साधनसामुग्री याबाबत गोपनियता पालन करणे आवश्यक राहील.

फ) कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील.

ग) प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच सदर प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहेत.

ह) अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांचे बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

ळ) कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात आलेल्या व्यक्तीने या विभागात **अचानक उदभवणाऱ्या समस्याकरीता तत्पर सेवा देणे बंधनकारक राहील.** म्हणजेच आपली सेवा या विभागाशी पुर्ण वेळ बांधील राहील.

**५. वयोमर्यादा : -** २५ ते ४५ वयोगटामधील

अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहिलेला/टंकलिखित अर्ज (संपुर्ण माहिती असलेला जसे संपूर्ण नांव, जन्मतारीख, पत्ता, शिक्षण, अनुभव इत्यादी) दिनांक १५.०१.२०२५ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत या कार्यालयाचे खालील पत्त्यावर सादर करावेत. अथवा, कार्यालयाचे dycfkop२००७@gmail.com या ई मेलवर सादर करावेत. ई मेलव्दारे अर्ज सादर केलेल्या व्यक्तिने अर्ज कार्यालयास प्राप्त झालेची खात्री करावी.

**६. अर्ज करण्याचा पत्ता :** उपवनसंरक्षक, कोल्हापूर वनविभाग कोल्हापूर यांचे कार्यालय, "वनवर्धन" इमारत, तळमजला, मुख्य पोस्ट ऑफीस समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३ दूरध्वनी क्रमांक (०२३१) २६५१९५९

**८. मुलाखत तारीख व वेळ :-**
दिनांक १५.०१.२०२५ पर्यंत या कार्यालयास अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस दिनांक २३.०१.२०२५ रोजी सकाळी ११.३० वा. या कार्यालयामध्ये मुलाखतीस बोलावण्यात येत आहे. मुलाखतीच्या तारखेमध्ये कोणताही बदल झाल्यास अर्जदारास अर्जावरील संपर्क क्रमांकवर संपर्क साधून कळविणेत येईल.

**९. निवड प्रक्रिया :-**
निम्नस्वाक्षरीकर्ता यांचे अध्यक्षतेखाली गठित केलेल्या कमिटी समोर दिनांक २३.०१.२०२५ रोजी उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल. यामध्ये समितीने निश्चित केलेल्या उमेदवाराची निवड केली जाईल. समितीचा निर्णय अंतिम राहील.

**९. इतर**
अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

ठिकाण - कोल्हापूर
दिनांक ३०.१२.२०२४

स्वाक्षरी/-
( जी. गुरूप्रसाद)
उपवनसंरक्षक,
कोल्हापूर वनविभाग, कोल्हापूर

# अर्जाचा नमूना

प्रति,

उपवनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर
"वनवर्धन" इमारत, तळमजला,
मुख्य पोस्ट ऑफीस समोर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर ४१६ ००३

| पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवावा |
|---|

**विषय : कंत्राटी पध्दतीने पशूवैद्यकीय अधिकारी सेवा पूरविणेबाबत.**

**संदर्भ** : वनविभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली सविस्तर जाहिरात

१ अर्जदाराचे संपूर्ण नांव :- ______________________________

आडनाव स्वत:चे नांव वडिलांचे नांव

२ जन्मतारीख :- ----/----/-------

३ शैक्षणिक पात्रता :-

४ संपूर्ण पत्ता :-

५ संपर्क / मोबाईल क्रमांक:-

६ ई मेल आयडी :-

७ पूर्व अनुभव बाबत तपशिल :-

८ वेतन / मानधन व प्रवासखर्च अपेक्षा :-

९ इतर :-

मी, ______________________________ शपथपूर्वक सादर करतो की, उपरोक्त नमूद माहिती हि सत्य असून त्याकरीता मी जबाबदार राहील. उपरोक्त कंत्राटी पध्दतीने सेवा करणेची संधी मिळाल्यास सर्व अटी शर्तीचे मी पालन करेल. तसेच, शासकीय सेवकाची जी कर्तव्ये असतात त्यात कसूर करणार नाही व इतर कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही.

दिनांक :-
ठिकाण :-